| पुणे पोलीस | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ १६८३ /२०२४ दिनांक :- ०२/०३/२०२४

## प्रेसनोट

पुणे शहरात मोठया प्रमाणात वाहनांचे संख्येमध्ये झालेली वाढ आणि विविध मोठे प्रकल्प (मेट्रो, उड्डाणपूल, विविध विकासकामे) सुरु असल्यामुळे तसेच अवजड वाहनांमुळे रस्त्यावरील जागा मोठया प्रमाणावर व्यापली जाऊन वाहतूकीस अडथळा निर्माण होतो. यामुळे नागरिकांना मोठा धोका व गैरसोय होते.

त्याकरिता जनतेस पोहचणारा धोका, अडथळा आणि गैरसोय टाळण्यासाठी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६ / ८७१ / सी. आर. - ३७ / टी. आर. ए. - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन मी शशिकांत बोराटे, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पुणे शहर, **पुणे शहरामधुन पिंपरी चिंचवड, सोलापूर, अहमदनगर, सातारा, मुंबई व इतर ठिकाणी जाणारी व येणारी सर्व प्रकारची जड अवजड माल वाहतूक करणारे ट्रेलर, कंटेनर्स, मल्टी ॲक्सल वाहने, आर्टिक्युलेटेड वाहनांसाठी तात्पुरत्या स्वरूपात प्रायोगिक तत्वावर खालील प्रमाणे दिनांक ०५/०३/२०२४ रोजी पासुन नव्याने आदेश निर्गमीत करीत आहे. सदर ठिकाणी यापुर्वी असलेले वाहतूकीचे सर्व आदेश रद्द समजण्यात येतील.**

१. **पुणे नगर मार्गावरून वाघोली पासुन पुणे शहराकडे २४ तास प्रवेश बंद राहील.**
   - **पर्यायी मार्ग :-** पुणे नगर रोडवरील शिक्रापूर येथुन उजवीकडे वळण घेवून चाकण मार्गे पिंपरी चिंचवड व तळेगाव दाभाडे मार्गे मुंबईकडे जातील. तसेच वरील मार्गावरूनच अहमदनगरकडे जातील.

२. **पुणे सोलापूर व पुणे सासवड रोडने येणाऱ्या वाहनांना हडपसर नोबल हॉस्पिटल चौक खराडी बायपास चौकाकडे २४ तास प्रवेश बंद राहील.**
   - **पर्यायी मार्ग १ :-** पुणे सोलापूर रोडवरून येणाऱ्या वाहनांनी थेऊर फाटा येथून उजवीकडे वळण घेवून थेऊर, लोणीकंद, शिक्रापूर मार्गे जावे
   - **पर्यायी मार्ग २ :-** पुणे सासवड रोडवरून येणाऱ्या वाहनांनी हडपसर येथे यु टर्न घेवून थेऊर फाटा येथुन डावीकडे वळण घेवून थेऊर, लोणीकंद, शिक्रापूर मार्गे पर्यंत जावे.

❖ **खालील नमुद मार्गावर वरील प्रकारच्या वाहनांना सकाळी ०७:०० ते २१:०० वा. पर्यंत प्रवेश बंद राहील.**

३. पुणे सोलापूर रोड येथुन सातारा, मुंबई कडे जाणाऱ्या वाहनांनी हडपसर येथुन डावीकडे वळण घेवून सासवड रोडवरून मंतरवाडी फाटा उजवीकडे वळण घेवून खडी मशीन चौक ते कात्रज चौक येथून सातारा कडे किंवा नवले पुल मार्गे मुंबईकडे जातील.
   तसेच सासवडकडुन येणाऱ्या वाहनांनी मंतरवाडी चौकामधून डावीकडे वळण घेवून वरील मार्गाचा वापर करावा.

४. मुंबई कडुन येणारी वाहने नवले पूल डावीकडे वळण घेवून कात्रज चौक तसेच साताराकडुन येणारी वाहने कात्रज चौक येथून खडी मशीन चौक मंतरवाडी चौक डावीकडे वळण घेवून हडपसर मार्गे सोलापूर कडे व मंतरवाडी चौकामधून उजवीकडे वळण घेवून सासवडकडे जावे.

❖ **तसेच वरील प्रमाणे सर्व प्रकारच्या वाहनांना खालील नमुद ठिकानांपासून शहराचे अंतर्गत भागामध्ये येण्यास २४ तास प्रवेश बंद असेल.**

१. सोलापूर रोड नोबल हॉस्पिटल चौक,
२. अहमदनगर रोड केसनंद फाटा वाघोली
३. मुंबई पुणे रोड हॅरीस ब्रीज,
४. औंध रोड राजीव गांधी पुल,
५. बाणेर रोड हॉटेल राधा चौक,
६. पाषाण रोड रामनगर जंक्शन,
७. पौड रोड चांदणी चौक,
८. सिंहगड रोड वडगाव पुल चौक,
९. सातारा रोड कात्रज चौक,
१०. सासवड रोड (बोपदेव घाट मार्ग) खडी मशीन चौक,
११. कात्रज मंतरवाडी बायपास रोड उंड्री चौक.
१२. आळंदी रोड बोफखेल फाटा चौक

2.3.24

**( शशिकांत बोराटे )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**